# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/10/2023 (गुरूवार) दुपार

---

**पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतुन अवैध रित्या विना परवाना , शासनाचा महसुल बुडवुन रेतीची वाहतुक करणाऱ्या तीन १६ चाकी व एक १४ चाकी असे चार नॅशनल परमिट ट्रकांना कन्हान पोलीसांनी पकडुन भादवि कलम ३७९,१०९,३४ सहकलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमिन व महसुल अधिनियम १९६६ अन्वये कार्यवाही केले बाबत.**

दिनांक ०४/१०/२०२३ रोजी कन्हान पोलीस स्टेशनचे पोलीस पथक हे मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष. ए. पोद्दार यांचे अवैध रेती वाहतुक थांबविण्याचे शुन्य सहनशीलता धोरण प्रमाणे संपुर्ण पो.स्टे. परिसरात कोणीही अवैध रेतीची वाहतुक करणार नाही या हेतुने मिळालेल्या माहीती वरुन पो.स्टे. हद्दीतील मौजा टेकाडी शिवारातील NH-४४ जबलपुर ते नागपुर रोडवर लक्ष्मी लॉज से समोर दोन पंचांसह नाकाबंदी केली असता ट्रक क्रं. १) १६ चाकी नॅशनल परमिट ट्रक क्र. एम.एच–३२–ए.जे–५९३१ व त्यामधील ९ ब्रास रेती, २) १६ चाकी नॅशनल परमिट ट्रक क्र. एम. एच.–३२/ए.के–५९३२ व त्यामधील ९ ब्रास रेती, ३) १६ चाकी नॅशनल परमिट ट्रक क्र. एम. एच.–३२/ए. के–१७८६ व त्यामधील ९ ब्रास रेती, ३) १४ चाकी नॅशनल परमिट ट्रक क्र. एम. एच–३२/क्यु–५९३१ व त्यामधील ८ ब्रास रेती असे एकुण ३५ ब्रास रेती, ४ ट्रक सह एकुण १,१६,१०,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेण्यात आला. त्याच प्रमाणे चारही ट्रक चालक क्रं. **१) शरद रामेश्वर सिराम, वय ४१ वर्ष रा. सुकडी बाई ता. सेलु जिल्हा वर्धा, २) शेख इरफान शेख बुरहान वय ४२ वर्ष रा.सालोड (हिरापुर) ता. जि. वर्धा, ३) राजेंद्र बाबुराव वांदिले वय ४१ वर्ष, रा. माहुरे लेआऊट वार्ड नं. २ बस स्टॉप चे मागे सेलु जिल्हा वर्धा, ४) अविनाश नत्थुजी मडावी वय ३१ वर्षे रा. खडकी तह.सेलु जिल्हा वर्धा** यांचे तसेच ट्रक मालकांचे विरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, १०९, ३४ भादंवी सह कलम ४८ (७) (८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनीयम १९६६ कादयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. संदीप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पुंडलिक भटकर यांचे मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते, सहायक पोलीस निरीक्षक चेतनसिंह चौहाण, सहायक फौजदार गणेष पाल, सदाशिव काठे, पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, हरीष सोनभद्रे, पोलीस नायक अमोल नागरे, महेंद्र जळितकर, अनिल यादव, पोलीस अंमलदार नविन पाटील, अश्विन गजभिये, चालक पोलीस हवालदार अजय भगतव, होमगार्ड सैनिक हटवार यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर